मा. न्यायालय प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** रायगड **P.S.(ठाणे):** पाली **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0050 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/04/2021 09:25 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 16/04/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/04/2021
**Time From (वेळेपासून):** 13:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 08:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/04/2021 **Time (वेळ):** 08:50 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 011 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/04/2021 08:50 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मौजे दुययम निबंधक सुधागड पाली

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** आत्मलिंग दगडु बावकर

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1966 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|

पोलीस निरीक्षक पाली, जि. रायगड

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पाथरूड,भुम,उस्मानाबाद शहर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बल्लाळेश्वर मंदीराजवळ,देऊळवाडा, पाली,सुधागड, ,पाली,रायगड,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9011000599

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जितेंद्र पुरूष्षोत्तम वाईकर | | | 1. दुय्यम निबंधक, सुधागड पाली ,सुधागड ,पाली,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | हरेश संजय ठाकूर | | | 1. मढाली, ,सुधागड, ,पाली,रायगड, महाराष्ट्र,भारत |
| 3 | महम्मद गुलाम रब्बानी इंद्रीस आशी शेख | | | 1. दुंडी, विनायक नगर,,आशीयाना बंगलो, पाली,,सुधागड,पाली,रायगड,महाराष्ट्र, भारत |
| 4 | राजेश सरदारमच राठोड | | | 1. पाली बाजारपेठ, गांधीचैक,सुधागड, पाली,रायगड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20000 | 20,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 20,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी आत्मलिंग दगडु बावकर, वय 55 वर्षे, व्यवसाय- शेती, सध्या रा. बल्लाळेश्वर मंदीराजवळ, देऊळवाडा, पाली,ता सुधागड, जिल्हा रायगड मुळ रा.मु.पोस्ट पाथरूड, ता.भुम जि. उस्मानाबाद, (मोबाईल नंबर 9011000599, 9860243198) समक्ष पाली पोलीस ठाणे येथे हजर राहून खबर लिहून देतो की,

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह रहातो. माझा पाली बल्लाळेश्वर मंदिराजवळ पेढे विक्रीचा व्यवसाय आहे. मी राहत असलेल्या अशियाना फलक बिल्डींग मध्ये तळ मजल्यावर श्री.महम्मद गुलामरबानी महम्मद इंद्रीसआसी शेख उर्फ गुलाम बिल्डर्स यांच्याकडून दोन सदनिका मला मिळणार होत्या. एक सदनिका माझ्या मालकीच्या मौजे पाली येथील सव्र्हे क्रमांक 44/4 क्षेत्र 321 चैरस मिटर या जागेच्या बदल्यात आशियाना फलक या बिल्डींमध्ये माझे मुलाचे नावावर करून देणार होते. व त्याच बिल्डींमध्ये मी 535 स्क्वेअर फुटाचा फ्लॅट 12,50,000/- रूपायांस गुलाम बिल्डर शेख यांचेकडुन माझ्या दुसरा मुलगा रविकिरण बावकर यांचे नावांने खरेदीखताने विकत घेणार होतो.

श्री.गुलाम बिल्डर यांनी मला सदनिका रजिस्ट्रेशन करणेसाठी पाली येथील गांधी चैक येथील राजेश राठोड स्टॅम्प व्हेंडर यांना जावून भेटा व सर्व कागदपत्रे त्यांना दया. यावरून मी दिनांक 07/4/2021 रोजी बिल्डर कडून कागदपत्रे घेवून स्टॅम्प व्हेंडर राजेश राठोड यांना भेटलो तेव्हा त्यांनी माझी कागदपत्रे पाहून मला स्टॅम्प डयुटी, नोंदणी फी बाबत माहिती दिली.

त्यानंतर मी दिनांक 12/04/2021 रोजी राजेश राठोड, स्टॅम्प व्हेंडर यांचे कडे जावून मी त्यांच्या कडे दोन्ही सदनिकांचे स्टॅम्प फी आणि नोंदणी शुल्क, आणि दस्तऐवज तयार करण्याचे पैसे असे एकुण 2,50,000/- रूपये जमा केले. त्यांनी सदरचे दोन्ही सदनिकांचे पैसे त्यांचेकडे जमा करून घेवून मला त्यांच्याकडील पावती दिली. तसेच सदरचे दोन्ही दस्त तयार करून घेवून दिनांक 15/04/2021 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय पाली येथे सदनिकांचे दस्त नोंदणी करीता टोकन घेवून वेळ घेणार असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री.वाईकर, दुय्यम निबंधक पाली यांना प्रत्येक दस्ताचे 12,000/- रूपये या प्रमाणे 24,000/- रूपये दयावे लागतील असे राजेश राठोड यांनी सांगितले. त्यावर मी त्यांना म्हणालो हे पैसे कसले आहेत. याची काही पावती मिळेल का? त्यावर त्यांनी मला सांगितले की, त्याची पावती मिळणार नाही हे पैसे प्रत्येक नोंदणी साठी दुय्यम निबंधक, पाली यांना दयावेच लागतात साहेब पैसे घेतल्याशिवाय रजिस्ट्रेशन करीतच नाहीत असे सांगितले. म्हणून मी श्री. वाईकर साहेब, दुय्यम निबंधक, पाली यांना त्यांच्या कार्यालयात जावून भेटलो. तसेच त्यांना माझे सदनिकांचे रजिस्ट्रेशन चे कामाबाबत माहिती देवून श्री.राजेश राठोड, स्टॅम्प व्हेंडर हे आपल्याला देण्यासाठी प्रत्येक दस्ताच्या रजिस्ट्रेशन चे 12,000/- रूपये या प्रमाणे दोन दस्त नोंदणीचे 24,000/- सांगत आहेत. त्यावर श्री.वाईकर साहेब यांनी मला सांगितले की, राजेश राठोड हे सांगत असल्याप्रमाणे पुर्तता करा तुमचे सदनिकांचे रजिस्ट्रेशन करून घेवू असे बोलले.

यावरून माझी खात्री झाली की, माझे दोन्ही मुलांचे नावे सदनिकांचे खरेदीचे दस्त दुय्यम निबंधक कार्यालय पाली येथे नोंदणी करीता श्री. राजेश राठोड, स्टॅम्प व्हेंडर पाली यांच्या मार्फत प्रत्येक दस्ताचे 12,000/- रूपये याप्रमाणे 24,000/- रूपये लाचेची रक्कम श्री.वाईकर, दुय्यम निबंधक, पाली हे मागणी करीत आहेत. त्यामुळे श्री.राजेश राठोड, स्टॅम्प व्हेंडर व श्री.वाईकर, दुय्यम निबंधक अधिकारी, पाली यांचेवर योग्य ती कारवाई करणेकरीता मी त्यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत तक्रार दिनांक 12/04/2021 रोजी पाली येथे पोलीस उप अधीक्षक श्रीमती सुषमा सोनावणे मॅडम यांना दिली.

दिनांक 13/04/2021 रोजी एजंट राजेश राठोड यांचेकडे मी दोन्ही दस्ताचे चलनासाठी 2,50,00/- रू.दिले त्याप्रमाणे राठोड यांनी ऑनलाईन 2,38,000/- चलन भरल्याची पावती मला दिली आहे.त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सुषमा सोनावणे, मॅडम यांनी मला सांगितले की, दिनांक 13/04/2021 व दिनांक 14/04/2021 रोजी शासकीय सुटटी असल्याने लोकसेवक यांची भेट होणे शक्य नसल्याने मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 15/04/2021 रोजी मौजे पाली, ता. सुधागड येथे जावून दोन पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल. त्यानंतर श्रीमती सोनावणे मॅडम यांनी पडताळणी व सापाळा कारवाई बाबतची सविस्तर माहिती देवून योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्रीमती सोनावणे मॅडम यांनी मला याबाबत गोपनीयता राखण्याच्या सुचना देवून मला दिनांक 15/04/2021 रोजी सकाळी 09-00 वाजताचे सुमारस उन्हेरे धरणाकडे जाणारे रस्त्यावर पाली येथे हजर राहण्याच्या सूचना दिल्या.

श्रीमती सोनावणे मॅडम यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे मी दिनांक 15/04/2021 रोजी सकाळी 09-00 चे सुमारास सोनावणे मॅडम यांना फोनवर संपर्क करून उन्हेरे धरणाकडे जाणा-या रोडलगत जावून श्रीमती सोनावणे मॅडम यांना भेटलो त्या स्टाफ सह खाजगी इनोव्हा कारने सदर ठिकाणी आल्या होत्या. त्यानंतर श्रीमती सोनावणे मॅडम यांनी त्यांचे सोबत आलेल्या एसीबी स्टाफची तसेच वन विभाग नागोठणे येथील पंच साक्षीदार 1) एकनाथ बन्सीराम धुळे, वनरक्षक व 2) हरिदास भिमराव करांडे, वनरक्षक यांची व माझी आमची एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर श्रीमती सोनावणे मॅडम यांनी पडताळणीचे कार्यवाहीबाबत आम्हास माहिती देवून योग्य त्या सूचना दिल्या. आणि माझी व पंचांची वक्तव्य डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी सुमारे 10-10 वाजता माझे कडे व्हाईस रेकॉर्डर सुरू करून देवून मला पंच श्री. एकनाथ धुळे माझे दोन्ही मुलांसह सह दुय्यम निबंधक कार्यालय पाली सुधागड येथे जावून वाईकर यांची भेट घेवून त्यांचेकडे फ्लॅटचे रजिस्ट्रेशनचे कागदपत्र दाखवून रजिस्ट्रेशन करायचे असल्याबाबत सांगीतले. त्यावेळी श्री. वाईकर यांनी मला सांगितले की, आता कोव्हीडमुळे कार्यालयात गर्दी करू नयेत असे निर्देश आहेत. 2 मे 2021 नंतर लॉकडाऊन संपल्यावर तुमचे दस्त नोंदणी केली जाईल असे सांगितले तेव्हा कार्यालयात हजर असलेले स्टॅम्पवेंडर राजेश राठोड यांनी माझे मुलाला सांगितले की, दुपारून काहीतरी करून बघतो दुपारून या असे सांगितल्याने मी पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सदरचे समक्ष भेटीतील संभाषण व्हाईस रेकऑर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर पुन्हा सुमारे 14-15 वाजता माझे कडे व्हाईस रेकऑर्डर सुरू करून देवून मला पंच श्री. एकनाथ धुळे यांचे सह दुय्यम निबंधक कार्यालय पाली - सुधागड येथे जावून वाईकर यांची भेट घेतली असता श्री. वाईकर यांनी मला कोरोना लॉकडाऊनचे निमित्त सांगुने माझे रजिस्टेशनचे काम दिनांक 02 मे 2021 चे नतंर होईल असे सांगीतले. त्यानंतर मी पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत जाण्यासाठी कार्यालयाचे बाहेर आलो असता कार्यालयाचे बाहेर गुलाम बिल्डर भेटले वाईकर साहेबांनी दस्त नोंदणी बंद केले असल्याचे सांगितले. तेव्हा गुलाम बिल्डर यांनी मला सांगितले की, बंद बिंद काही नाही त्यांचे पैसे दिलेस की ते दस्त नोंदणी करून देतील त्यावर मी गुलाम बिल्डरला विनंती केली की, आपणच स्वतः वाईकर साहेबांकडे जावून दस्त नोंदणी बाबत चर्चा करावी. त्यानंतर गुलाम बिल्डर व मी माझी मुल व पंच साक्षीदार असे वाईकर साहेबांना जावूनपुन्हा भेटलो तेव्हा वाईकर साहेब यांनी मला सांगितले की, वरीष्ठ कार्यालयाचे निर्देश आल्यावर तुम्हाला बोलावून सर्व प्रथम दस्त नोंदणी करून घेतो असे सांगितले त्यानंतर मी वाईकर साहेबांना सांगितले की, राठोड यांनी प्रत्येक दस्ताचे 12 हजार असे दोन दस्तांचे 24 हजार रूपये आपणास दयावे लागतील त्यामध्ये काहीतरी कमी करा व दस्त नोंदणी करून घ्या असे बोलल्यावर त्याबाबत आपण नंतर बोलू, नंतर बोलतो असे वाईकर यांनी सांगितले. सदरचे समक्ष भेटीतील संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर काही वेळाने श्रीमती सोनावणे यांचे सुचनेप्रमाणे 15-10 वाजताचे सुमारास मी माझे मोबाईल वरून एजंट श्री. राजेश राठोड यांचे मोबाईलवर कॉल करून त्यांना मी रजिस्टेशनचे कामाकरीता दुय्यम निबंधक कार्यालय पाली येथे जावून श्री. वाईकर यांची भेट घेतली असता त्यांनी आमच रजिस्टेशनचे काम कोरोना लॉकडाऊन असल्याने 02 मे 2021 चे नतंर होणार असल्याचे मला सांगीतले असल्याबाबत श्री. राठोड यांना सांगीतले. त्यावेळी श्री. राठोड यांनी मला तुम्ही ठरल्याप्रमाणे 20,000/- रूपये वाईकर यांना दिले नाहीत त्यामुळे त्यांनी तुमचे रजिस्ट्रेशनचे काम केले नाही. तुम्ही रजिस्टेशनचे कागदपत्र घेवून माझेकडे या मी साहेबांशी बोलून घेतो. तुमचे रजिस्टेशनचे काम उदया होईल. असे मला सांगीतले. सदर संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर काही वेळातच माझे मोबाईलवर श्री. गुलाम शेख (बिल्डर) यांचा मिसकॉल आला त्यामुळे श्रीमती सोनावणे यांचे सुचनेप्रमाणे मी सुमारे 15-28 वाजता श्री. गुलाम शेख (बिल्डर) यांचा माझे मोबाईलवर कॉल केला त्यावेळी त्यांनी मला श्री.राठोड यांचेकडे रजिस्टेशनची कागदपत्रे घेवून बोलावले. सदर कॉल व्हाईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्यात आला आहे. त्यानंतर माझे कडे व्हाईस रेकॉर्डर सुरू करून देवून मी व पंच श्री. धुळे यांचेसह श्री. राठोड यांचे पाली येथे गांधी चैक येथील कार्यालयात जावून बाबू राठोड यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी माझे कडे रजिस्टेशनची कागदपत्रे मागीतली त्यावेळी मी माझेकडील रजिस्टेशनची कागदपत्रे त्यांचेकडे दिली. त्यावेळी त्यांनी मला रजिस्टेशन संदर्भातील कागदपत्रे तयार करून देवून माझेकडे टोकन देवून मला दिनांक 16/04/2021 रोजी सकाळी 10-00 वाजता दुय्यम निबंधक कार्यालय पाली सुधागड येथे रजिस्टेशनचे काम करण्यासाठी जाण्यास सांगीतले. त्यानंतर मी पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सदर संभाषण हे



पोलीस निरीक्षक पाली, जि. रायगड

पंच साक्षीदार यांचे समक्ष झालेले असून व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुदीत करण्यात आलेले आहे.

त्यानंतर श्रीमती सोनावणे यांनी मला सांगीतले की, दिनांक 15/04/2021 रोजी केलेल्या पडताळणीमध्ये सुरवातीस लोकसेवक यांची भेट घेतली असता त्यांनी माझे काम करण्यास टाळाटाळ करून रजिस्टेशनचे काम दिनांक 02/05/2021 रोजी नतर करण्यात येईल असे सांगीतले. त्यानंतर कामाचे संदर्भात श्री. राठोड यांचेशी संपर्क साधून त्यांची समक्ष भेट घेतली असता त्यांची माझे रजिस्टेशनचे कामासंदर्भातील डॉक्युमेंन्ट तयार करून दिनांक 16/04/2021 रोजीचे टोकन तयार करून दिले. व मला दिनांक 16/04/2021 रोजी रजिस्टेशनकामा करीता दुय्यम निबंधक कार्यालय पाली सुधागड येथे जाण्याबाबत सांगीतले आहे. त्यामुळे माझे तक्रारीची पडताळणी झाली नसल्याने दिनांक 16/04/2021 रोजी पुन्हा पडताळणी करण्यात येईल व त्यावेळी लोकसेवक श्री. वाईकर यांनी पैश्याची मागणी केल्यास त्यानंतर सापळा आयोजीत करण्यात येईल. असे सांगीतले. त्यानंतर श्रीमती सोनावणे यांनी मला पुढील कार्यवाहीकरीता दिनांक 16/04/2021 रोजी उन्हेरे धरणाकडे जाणा-या रस्त्यालगत पाली येथे सकाळी 9-00 वाजता हजर राहण्याच्या सुचना देवून केलेल्या कार्यवाही बाबत गोपनीयता ठेवण्याबाबत सूचना दिल्या. तसेच दिनांक 15/04/2021 रोजी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा अ◌ेसीबी कार्यालय अलिबाग येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

श्रीमती सोनावणे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक 16/04/2021 रोजी सकाळी 09-40 वाजता उन्हेरे धरणाकडे जाणा-या रस्त्यालगत पाली येथे हजर झालो. त्यानंतर काही वेळाने श्रीमती सोनावणे मॅडम, अ◌ेसीबी पथक व पंच साक्षीदार असे सदर ठिकाणी खाजगी इनोव्हाने आले. त्यानंतर श्रीमती सोनावणे मॅडम यांनी मला, पंच व पथकाला योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी सुमारे 09-55 वाजता माझे कडे व्हाईस रेकॉर्डर सुरू करून देवून मला पंच श्री. एकनाथ धुळे यांचे सह दुय्यम निबंधक कार्यालय पाली सुधागड येथे जावून श्री.वाईकर यांची भेट घेण्यासाठी सांगितले त्याप्रमाणे पंचा समक्ष मी दुय्यम निबंधक कार्यालयात पाली सुधागड येथे आलो. तेथे एजंट राजेश राठोड हे कार्यालयाचे बाहेर हजरच होते. त्यांची समक्ष भेट झाली मी त्यांना म्हणालो आज रजिस्टेशन करून घ्या त्यावेळी ते मला म्हणाले तुम्ही वाईकर साहेबांना भेटुन त्यांचीशी पैशां संदर्भात समक्ष बोलून घ्या. परंतू वाईकर साहेब कार्यालयात आले नव्हते. ते कार्यालयात येईपर्यत मी कार्यालयाचे बाहेर थांबून ते आल्यानतंर त्यांचे केबिनमध्ये जावून वाईकर साहेब यांना भेटून रजिस्टेशनबाबत त्यांना विचारणा केली असता ते मला म्हणले रजिस्टेशन आजपण बंद आहे. त्यानंतर मी पंचासह कार्यालयाचे बाहेर पडलो व पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सदर संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले आहे.

त्यानंतर सुमारे 11-13 चे सुमारास गुलाम शेख (बिल्डर) यांचा माझे मोबाईलवर कॉल आला. व त्यावेळी त्यांनी मला 'कुठे आहात, आपल्याला रजिस्टेशन करायच आहे, तुम्ही राजेशच्या ऑफिसला या आपण रजिस्टेशन ऑफिसला जावू' असे सांगीतले. त्यानंतर मला लगेचच व्हाईस रेकॉर्डर सुरू करून देवून पंच श्री. धुळे यांचे सह पडताळणीकरीता रवाना केले. त्यावेळी मी व पंच असे श्री. राठोड यांचे ऑफिसकडून रजिस्टेशनचे पेपर घेवून गुलाम शेख यांचेसह रजिस्टेशन कार्यालय पाली येथे आलो तेथे राजेश राठोड हे कार्यालयातच हजर होते. त्यावेळी आम्ही तिघांनी वाईकर यांची त्यांचे केबिनमध्ये पंचांसमक्ष भेट घेतली असता त्यावेळी गुलाम शेख यांनी मला पैसे आणले का? असे वाईकर यांचेसमक्ष विचारणा केली. त्यावेळी मी किती पैसे असे विचारले असता गुलाम शेख यांनी मला 20000/- असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना कमी करा थोडे असे बोललो असता तुम्ही साहेबांना बोला असे ते मला म्हणाले. त्यावेळी मी वाईकर यांना बोललो असता त्यांनी मला बिल्डर गुलाम शेख यांचेशी बोला असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे असे सांगून पंचासह कार्यालयातून बाहेर आलो. त्यावेळी मी गुलाम शेख यांना मी बँकेतून पैसे घेवून येतो असे सांगून पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सदर संभाषण हे पंचांसमक्ष झालेले असून व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुदीत झालेले आहे.

त्यानंतर श्रीमती सोनावणे यांनी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचांसमक्ष ऐकुन 20,000/- रूपये लाचेची मागणी झाल्याबाबत खात्री केली. त्यावेळी माझे रजिस्टेशनचे कामासाठी वाईकर यांनी स्वतःसाठी तसेच गुलाम शेख यांनी वाईकर साहेब यांचेसाठी 20000/- रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम गुलाम शेख यांनी स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने श्रीमती सोनावणे मॅडम यांनी लोकसेवक वाईकर व गुलाम शेख यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरवून त्या अनुषंगाने सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही करून योग्य त्या सूचना दिल्या. त्यावेळी मी माझे कडील 20000/- रूपये रक्कम सापळा कारवाईकरीता वापरण्याकरीता श्रीमती सोनावणे मॅडम यांचेकडे हजर केली.

त्यानंतर सुमारे 12-31 वाजता माझे कडे लाचेची रक्कम 20,000/- रूपये अ◌ॅथ्रासीन पावडर लावलेले माझे जवळ देवून मला पंच साक्षीदार श्री.एकनाथ धुळे यांचेसह रजिस्टेशन कार्यालय पाली येथे पंचासमक्ष रवाना केले. त्यावेळी मी रजिस्टेशन ऑफिसमध्ये येवून वाईकर यांचे केबिनमध्ये पंचांसमक्ष गेलो असता त्यावेळी गुलाम शेख व राजेश राठोड हे वाईकर यांचे केबिनमध्ये हजर होते. त्यावेळी मी एजंट राजेश राठोड यांना साहेबांना किती दयावे लागतील असे विचारले असता 24हजार दया एकाला 12 आहेत दोनला 24 होतात 12 हजार पर डॉक्युमेंटचे असे सांगितले त्यावर मी त्यांना काय कमी करायला सांगा जरा असे बोललो असता साहेबांना भेटा काय होतील ते दया असे त्यांनी मला सांगितले त्यावर मी त्यांना पैसे साहेबांकडे देयाचे का असे विचारले असता त्यांनी हो सांगितले त्यावेळी मी लाचेची रक्कम वाईकर यांना देण्यासाठी काढली असता वाईकर यांनी हातानी इशारा करून गुलाम शेख यांचेकडे देण्यास सांगितले गुलाम शेख यांनी लाचेची रक्कम माझ्याकडून स्विकारून वाईकर यांना देण्यासाठी गेले असता वाईकर यांनी हाताच्या इशाराने लाचेची रक्कम कार्यालयातील कर्मचारी हरेश ठाकूर यांच्याकडे देण्यास सांगितली त्यानंतर राजेश राठोड यांनी हरेश यास हाक मारून लाचेची रक्कम स्विकारण्यास सांगितली कर्मचारी हरेश ठाकूर याचेकडे इशारा करून पैसे त्यांचेकडे देण्याचे हाताचे इशाराने खुणावले. त्यावेळी गुलाम शेख बिल्डर यांनी जितेंद्र वाईकर यांचेसमक्ष हरेश ठाकुर यास सदर लाचेची रक्कम दिली. त्यावेळी हरेश ठाकुर याने सदर रक्कम स्विकारून तो वाईकर यांचे केबिनमध्ये आला व तो सदर लाचेची रक्कम वाईकर यांचे टेबलचे ड्रॉव्हर मध्ये ठेवत असताना वाईकर यांनी त्यास तुझेकडेच ठेव असे सांगीतले. त्यावेळी मी कार्यालयाचे बाहेर येवून बिल्डर गुलाम शेख व हरेश ठाकुर यांनी लाच स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला व त्यावेळी सुमारे 13-15 वाजता अ◌ॅन्टी करप्शन पथकाने जितेंद्र वाईकर, गुलाम शेख बिल्डर, राजेश राठोड एजंट व हरेश ठाकुर यांस ताब्यात घेतले. व हरेश ठाकूर याचेकडून लाचेची रक्कम जप्त केली.

अशा रितीने श्री.जितेंद्र पुरूषोत्तम वाईकर, वय 51 वर्षे, दुय्यम निबंधक, सुधागड पाली वर्ग-3 यांनी माझेकडे माझे दोन्ही मुले 1) शिवप्रसाद बावकर, व 2)रविकिरण बावकर यांचे दस्तऐवज नोंदणी करून घेणेसाठी लोकसेवक जितेंद्र वाईकर, दुय्यम निबंधक, पाली ता. सुधागड यांनी स्वतःसाठी तसेच महम्मद गुलाम रब्बानी इंद्रीस आशी शेख वय-44, बिल्डर व आरोपी राजेश सरदारमच राठोड वय - 45 वर्षे, एजंट यांनी लोकसेवक जितेंद्र वाईकर, दुय्यम निबंधक यांचेकरीता माझ्याकडे दिनांक 16/04/2021 रोजी पंच साक्षीदार यांच्या समक्ष 20,000/- रूपये लाचेची मागणी करून आरोपी हेरश संजय ठाकुर यांनी 13.15 वाजता 20,000/- लाचेची रक्कम दुय्यम निबंधक कार्यालय सुधागड पाली येथे पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारताना अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड पथकाने रंगेहाथ पकडून लाचेची रक्कम हरेश ठाकूर यांचेकडून हस्तगत घेण्यात आली आहे.

म्हणुन माझी 1)जितेंद्र पुरूष्षोत्तम वाईकर, वय 51 वर्षे दुय्यम निबंधक, सुधागड पाली वर्ग-3, रा. समर्थ प्रसाद बिल्डींग, रूम नं. 2,

पहिला मजला, पेण, ता. पेण , जि. रायगड 2) हरेश संजय ठाकूर, वय 24 वर्षे, खाजगी कर्मचारी, दुय्यम निबंधक कार्यालय पाली सुधागड, रा. मढाली, ता. सुधागड, जि. रायगड 3) आरोपी महम्मद गुलाम रब्बानी इंद्रीस आशी शेख वय-44, बिल्डर, रा. दुंडी, विनायक नगर, आशीयाना बंगलो, पाली, ता. सुधागड, जि. रायगड 4) राजेश सरदारमच राठोड, वय 45 वर्षे, एजंट, रा. पाली बाजारपेठ, गांधीचैक, ता. सुधागड, जि. रायगड यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (संशोधन2018) चे कलम 7, 7(अ), 12 प्रमाणे फिर्याद आहे.

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** VIJAY abhimanyu TAYDE(I (Inspector)) / PCMH86424 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

[signature]

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची)

इ.पो.ठाणे अमलदार

**Name (नाव):** VIJAY abhimanyu TAYDE

पाली पोलिस स्टेशन

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PCMH86424

पोलीस निरीक्षक पाली, जि. रायगड

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 4 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**